**MHKO100002402014**

## रे.क.नं. ९७/२०१४ मधील निशाणी क्र. ५५ वरील आदेश

वादीतर्फे वारस यांनी सदरचा अर्ज वादी क्र. ३ चे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादीतर्फे वारस यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादीतर्फे वारस यांचे असे कथन आहे की, वादी क्र. ३ प्रकाश लक्ष्मण देसाई हे दिनांक २३/०९/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी ४७ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. दरम्यानच्या काळात कोवीड १९ चा प्रादुर्भाव वाढल्यामुळे सर्वत्र लॉकडाऊन होते. सबब वादी यांनी वादी क्र. ३ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**४.** प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, सदरच्या अर्जातील कारण योग्य नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादीतर्फे वारस यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वादी क्र. ३ चे वारस

रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादीतर्फे वारस यांनी वादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादीतर्फे वारस यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

**वादीतर्फे वारस यांचा निशाणी क्र. ५५ वरील अर्ज प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) खर्चादाखल देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.**

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2022.10.10 17:35:36 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १०/१०/२०२२

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100002402014

## रे.क.नं. ९७/२०१४ मधील निशाणी क्र. ५६ वरील आदेश

वादीतर्फे वारस यांनी सदरचा अर्ज वादी क्र. ३ चे विरुध्द झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे वारस यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादीतर्फे वारस यांचे असे कथन आहे की, वादी क्र. ३ प्रकाश लक्ष्मण देसाई हे दिनांक २३/०९/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. वादी यांना मयताचे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणावे लागतात याची माहीती नव्हती. दरम्यानच्या कालावधीमध्ये लॉकडाऊन लागू केलेमुळे कागदपत्रांची पुर्तता करता आली नाही. सबब वादीतर्फे वारस यांनी वादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, सदरच्या अर्जातील कारण योग्य नाही. वादी यांनी विलंबाबत कारण स्पष्ट नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादीतर्फे वारस यांचा निशाणी क्र. ५५ वरील अबेटमेटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठीचा अर्ज खर्चादाखल रक्कम देणेच्या अटीवर मंजूर करणेत आलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

**वादीतर्फे वारस यांचा निशाणी क्र. ५६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.**
(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १०/१०/२०२२

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100002402014

**रे.क.नं. ९७/२०१४ मधील निशाणी क्र. ५७ वरील आदेश**

वादीतर्फे वारस यांनी सदरचा अर्ज वादी क्र. ३ प्रकाश लक्ष्मण देसाई यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे वारस यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादीतर्फे वारस यांचे असे कथन आहे की, वादी क्र. ३ प्रकाश लक्ष्मण देसाई हे दिनांक २३/०९/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना अर्जात नमुद हेच सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

४. प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, अर्जातील कारण योग्य नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी वादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांचा निशाणी ५५ वरील वादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेबा विलंब माफीचा व अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेबाबतचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत . सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

**१)** वादीतर्फे वारस यांचा निशाणी क्र. ५७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२)** वादीतर्फे वारस यांनी दाव्यात वादी क्र. ३ च्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १०/१०/२०२२

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज